**कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची १३ वी मासिक बैठक दि.२७/०२/२०१८ च्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.**

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीत झालेल्या तक्रारींच्या सध्य:स्थिती बाबत झालेली चर्चा | सदस्य सचिवांनी समितीला मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.५ फेब्रुवारी २०१८ च्या आदेशानुसार पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीत झालेल्या तक्रारींचा सध्य:स्थिती अहवाल दि.२३ फेब्रुवारी २०१८ रोजी उच्च न्यायालयात सादर करण्याबाबतचे दिले होते असे सांगितले. त्यानुसार सदस्य सचिवांनी पाणथळ तक्रार निवारण समितीच्या तक्रारींचा सध्य:स्थिती अहवाल मा. उच्च न्यायालायात सादर केला होता. दि. २३ फेब्रुवारी २०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने पाणथळ जागेच्या Restoration संदर्भात सध्य:स्थिती अहवाल पुढील महिन्याच्या सुनावणीमध्ये सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने जागेचे Restoration करुन माहिती मा. उच्च न्यायालयात सादर करावयाची असल्याने त्याबाबतचा अहवाल, संबंधित कागदपत्रे व छायाचित्रे १५ दिवसात या कार्यालयात प्राधान्याने पाठविण्याबाबत सदस्य सचिवांनी संबंधित सर्वांना सूचना दिल्या आहेत.<br>उप आयुक्त यांनी सुध्दा या विषयावर प्राधान्याने लक्ष घाऊन या संबंधिच्या प्रत्येक तक्रारदारांविषयी ज्यांचे Restoration चे काम अजूनही प्रलंबित आहेत त्या संबंधित यंत्रणेला प्राधान्याने लवकरात लवकर तेथील काम पुर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानुसार समितीने पूर्वी Agenda मधून काढलेल्या तक्रारींचा आढावा घेतला. | **सर्व यंत्रणा** |
| २ | a) श्री.अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220)<br>b) श्री. फ्रान्सिस डिसोजा:- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | या तक्रारी संदर्भात मागील दि.३०.०१.२०१८ च्या बैठकीमध्ये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि संपुर्ण माहितीसह उपस्थित राहण्याचे आदेश समितीने तहसिलदार वसई यांना दिले होते. या तक्रारीं संदर्भात नायब तहसिलदार वसई हे उपस्थित होते त्यांनी या तक्रारी संदर्भात दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी पुढील सुनावणी दि.१२.०१.२०१८ अशी होती ती पुढे ढकलण्यात आली असून त्याची सुनावणी दि.०८.०३.२०१८ रोजी असल्याचे सागितले. त्या अनुषंगाने समितीने या सुनावणीचे पत्र अहवालासोबत पाठविण्यास सांगितले तसेच उपआयुक्त,कोकण विभाग यांनी उर्वरित अतिक्रमण हटविण्यात आले आहे की | जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नाही या बाबत नायब तहसिलदार यांना विचारणा केली असता त्यांनी दि.०८.०३.२०१८ पर्यंत अतिक्रमण हटविण्याचे काम पुर्ण होईल असे सांगितले.<br>सदस्य सचिवांनी सदर जागेचे अतिक्रमण हटवून त्या जागेची माहिती, ती जागा पाणथळ असल्यास त्याचे Geo Co-ordinates,जागेचे Restoration करुन जागेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे दि.०८.०३.२०१८ च्या आधी मा. उच्च न्यायालयात सादर करावयाची असल्याने प्राधान्याने कार्यवाही करण्यास सांगितले. | |
| ३ | a) श्री. कुलदिप चौधरी (मौजे नायगाव जि. पालघर)<br>b) श्री. अनिकेत स. वाडीवकर (आगाशी ता. वसई जि. पालघर)<br>c) श्री. मॅकेन्झी डांबरे (भुईगांव, वसई जि. पालघर)<br>d) श्री. स्टॅलिन डी (आगाशी ता. वसई जि. पालघर) | समितीने दि.३०.१०.२०१७ च्या बैठकीत तहसिलदार वसई यांना त्या जागेवर कांदळवनाची झाडे लावण्याचे आदेश देऊन ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले होते. त्या अनुषंगाने उपस्थित नायब तहसिलदार, वसई यांना सदर जागेवर Restoration चे काम पुर्ण झाले की नाही याबाबत विचारणा केली असता त्यांनी अद्याप Restoration चे काम झाले नसल्याचे सांगितले. समितीने सदर जागेवर लवकरात लवकर तेथील डेब्रिज हटवून तेथे पालघर जिल्हयातील वन विभागामार्फत तेथे झाडे लावून जागा Restore करण्यास सांगितले जर त्यांच्याकडे झाडे उपलब्ध नसतील तर विभागीय वन अधिकारी,मुंबई कांदळवन संधारण या विभागाकडून झाडे घेऊन तेथील सर्व जागा Restore करण्याचे सांगितले.<br>समितीने सदर जागेचे Geo Co-ordinates,जागेचे Restoration करुन जागेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल,छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे दि.08.03.2018 च्या आधी मा.उच्च न्यायालयात सादर करावयाची असल्याने प्राधान्याने कार्यवाही करण्यास सांगितले.<br>सदर बैठकीमध्ये चर्चे दरम्यान जिल्हाधिकारी पालघर यांनी पालघर जिल्हयातील Restoraion जागेची यादी देण्यास सदस्य सचिवांना सांगितले जेणेकरुन आम्ही या संदर्भात बैठक घेऊन Restoration चे संपुर्ण काम पुर्ण करता येईल. | जिल्हाधिकारी पालघर |
| ४ | श्री. रोहित जोशी :- (स्वामी समर्थ मार्ग,कोपरीठाणे पुर्व) | या तक्रारी संदर्भात समितीने पाण्याच्या भरतीच्या प्रवाहाच्या (Tidal Flow) दिशेने व्यवस्थितरित्या डेब्रिज हटविण्यासाठी २ आठवडयात सदर जागेवरील काम पूर्ण करण्याच्या ठाणे महानगरपालिका यांना सूचना दिल्या व तेथील जागेवर ठाणे वन विभागाच्या मदतीने | ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कांदळवनाची लागवड करण्याचे आदेश दिले होते. उप आयुक्त ठाणे महानगरपालिकेने डेब्रिज हटविण्याचे काम पुर्ण झाले असून ते पाण्याच्या भरतीच्या प्रवाहाच्या (Tidal Flow) दिशेने व्यवस्थितरित्या काम करण्यात आले आहे असे समितीला सांगितले. समितीने त्यांना सदर जागेच्या Plantation करण्यास सांगितले होते परंतु उप आयुक्त ठाणे महानगरपालिकेने सदर जागेच्या Plantation साठी १ महिना अधिक लागेल असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने त्यांना सदर जागेच्या Plantation साठी किती झाडे लागतील त्याची माहिती देण्यास सांगितले. त्यानुसार विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण विभाग Plantation करिता कांदळवनाची झाडे देण्यास इच्छुक असून श्री. स्टॅलिन, संचालक वनशक्ती यांनी त्यांच्या स्वयंसेवकांच्या मदतीने सदर क्षेत्राचे Plantation साठी सहभागी होण्यास इच्छूक असल्याचे सांगितले त्यानुसार आपण या दोन एजन्सीच्या सहाय्याने जागेचे Plantation करुन लवकरात लवकर काम प्राधान्याने पुर्ण करण्यास सांगितले व त्या संबंधित कागदपत्रे, छायाचित्रे अहवालासोबत पाठविण्याच्या सुचना दिल्या आहेत. | |
| ५ | श्री. विनोद पुन्शी व इतर (Complaint Regarding Destruction of Wetland behind NRI complex in sector 60 Nerul, New Mumbai) | या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांना अहवाल सादर करण्यास सागितले होते त्यानुसार सिडको यांनी दि.२२.०२.२०१८ च्या अहवालानुसार सदर ठिकाणी जागा साफ करताना दोन ते तीन फूट पॉकेट B मध्ये चूकून माती पडलेली होती ती माती काढून टाकण्यात येऊन ते क्षेत्र पुर्ववत करण्यात आले आहे. त्यानुसार समितीने ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | सिडको |
| ६ | श्री. स्टॅलिन डी Complaint Regarding Destruction of Wetland, Goregaon (East) Mumbai | या तक्रारी संदर्भात समितीने श्री. स्टॅलिन यांना त्या जागेचे Geo-Co-ordinates (GPS Reading) या संबंधी माहिती देण्यास सांगितले होते त्यानुसार श्री. स्टॅलीन डी यांनी सदस्य सचिवांना दिलेल्या Geo - co-ordinates 19.1485233 N, 72.8904589 E च्या पहाणी नुसार सदर क्षेत्र हे NWIA वेटलॅन्डमध्ये येत नाही. (Based on portal mrsac.maharashtra. gov. in/wrd.) त्यामुळे सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याने समितीने ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ७ | New Link Road Residence Forum, Dahisar West :- | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या दि.३०.०२.२०१७ च्या पत्राद्वारे उपलब्ध मुख्य वनसरंक्षक | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कांदळवन यांच्या अहवालानुसार सदर जागेवर माती भराव केला आहे व कांदळवनाची तोड झाल असल्याचे सांगितले होते. समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पॅन इंडिया पर्यटन प्रा. लि यांच्यावर ई.पी.ए. १९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्या व सदर जागेवर पॅन इंडिया प्रा. लि. यांनी तयार केलेला बांध हटविण्याचे सांगून तेथील जागा पाण्याच्या भरतीच्या प्रवाहाच्या (Tidal Flow) दिशेने व्यवस्थितरित्या काम करण्यास सांगितले व तेथील जागेत कांदळवनाची झाडे लावून या जागेचे restore करण्याचे आदेश दिले होते. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधीने सदर जागा जास्त मोठी असून त्यांच्या Plantation करिता जास्त कालावधी लागेल असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने पॅन इंडिया पर्यटन प्रा. लि. यांची स्वत:ची नर्सरी असल्यामुळे त्यांच्यामार्फत आणि मुंबई कांदळवन संधारण विभाग यांच्या मदतीने सदर जागेवरील काही हेक्टर जागा Restoration चे काम चालू करुन तेथील जास्ती जास्त जागा Restore करुन त्या बाबतचा अहवाल, छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे मा. उच्च न्यायालयाच्या पुढील सुनावणीच्या अगोदर पाठविण्याच्या सूचना दिल्या आहेत. | |
| ८ | धीरज परब:-<br>ईमेलद्वारा प्राप्त अर्ज | श्री. धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना एक महिन्याची मुदत अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अतिक्रमण हटविण्याचे काम पुर्णझाल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सांगितले परंतु श्री. धिरज परब यांनी दिलेल्या तक्रारींचे ठिकाण आणि कार्यवाही केलेल्या जागेचे ठिकाण यात फरक असल्याने योग्य जागेचे ठिकाण जाणून घेण्याबद्दल सांगितले होते. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने SDO ठाणे, वन विभाग यांच्याशी एकत्र येऊन दि.०५.०३.२०१८ रोजी सर्वे करणार असल्याचे सांगितले त्यात योग्य जागेचे ठिकाण आणि आवश्यक ते नकाशे देखील पुरविण्यात येतील. त्या अनुषंगाने तक्रारींचे निवारण सहजरीत्या करता येईल त्यानुसार समितीन या तक्रारी संबंधि संपूर्ण माहिती आणि कागदपत्रे देण्याबाबत सांगितले. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका. |
| ९ | श्री. नंदकुमार पवार:- (बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात मागील बैठकीमध्ये निवसी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर जागेत झाडे लावून जागा Restore करण्यास सांगितले होते त्यानुसार | जिल्हाधिकारी ठाणे, उपवनसंरक्षक ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समितीने त्यांना केलेल्या कार्यवाहीच्या अहवाला बाबत विचारणा केली असता त्यांनी या बाबतचा अहवाल, छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे दोन दिवसात समितीसमोर सादर करु असे सांगितले. सदस्य सचिवांनी सदर जागा Restore करण्यासाठी उपवनसंरक्षक ठाणे यांच्याकडे पत्र पाठविण्यात आले आहे. | |
| १० | श्री. ऑल्विन विन्सॅट रॉड्रीग्ज :- (मौजे बोळींज , स.न. 390 ता. वसई जि. पालघर) | या तक्रारी संदर्भात समितीने सदस्य सचिवांना त्या जागेचे Geo Co-ordinates (GPS Reading) या संबंधी माहिती घेण्यास सांगितले होते त्यानुसार सदस्य सचिवांनी श्री. ऑल्विन रॉड्रीग्ज यांनी दिलेल्या Geo co-ordinates च्या पहाणी नुसार सदर क्षेत्र हे NWIA वेटलॅन्डमध्ये येत नाही. (Based on portal mrsac.maharashtra. gov.in/wrd.) त्यामुळे सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याने समितीने ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी , पालघर आणि सदस्य सचिव |
| ११ | श्री. नंदकुमार पवार :- **Water reclamation at Bhandup,east opposite menon college.** (स्थळ:- भांडूप (पूर्व), मुंबई) | समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना चौकशी करुन पुढील बैठकीमध्ये या संदर्भात अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधीने सदर जागा ही पाणथळ (Mentioned as Salt Pan) असल्याचे सांगितले तसेच प्रत्यक्ष तक्रारदारासोबत सदर जागेची पहाणी केली असता तेथील जागेवर डेब्रिज टाकण्यात आले असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने सदर जागेचे डेब्रिज हटविण्यासाठी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी BMC/MCGM यांना पत्र देण्यात आले आहे असे सांगितले त्यानुसार समितीने या तक्रारीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे आदेश दिले आहेत. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| १२ | श्री. रेजी अब्राहम, अध्यक्ष, युनायटेड असोसिएशन. चारकोप कुंभारकला प्लॉटबाबत | श्री. रेजी अब्राहम यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई यांच्याकडे दिलेल्या Geo-co-ordinates 19.207N, 72.818E आणि 19.204N, 72.819E च्या पहाणी नुसार सदर क्षेत्र हे NWIA वेटलॅन्डमध्ये येत नाही. (Based on portal mrsac.maharashtra. gov. in/wrd.) त्यामुळे सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याने समितीने ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि विभागीय वन अधिकारी, कांदळवन संधारण घटक मुंबई, |
| १३ | श्री. नंदकुमार पवार:- Distruction and reclamation of mangroves and Wetlands at | या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनीधींनी सदर क्षेत्राच्या योग्य जागेचा उल्लेख | जिल्हाधिकारी, रायगड आणि सिडको |

<table>
<tr><td></td><td>Dronagiri Node, Uran.</td><td>नसल्याचे समितीला सांगितले. तसेच सदर पाणथळ जागेचे योग्य ठिकाण अवगत करण्यासाठी तक्रारदारांना पत्राद्वारे आणि दुरध्वनीद्वारे संपर्क केला असून सुध्दा अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. परंतु श्री. स्टॅलिन यांनी तक्रारदार या संदर्भात माहिती देण्यास तयार आहेत. त्यानुसार समितीने जिल्हाधिकारी रायगड यांना पुन्हा एकदा संधी देऊन योग्य जागेची पहाणी करण्यास व तक्रारदारास पत्र पाठवून संपर्क करण्यास सांगितले व केलेला पत्रव्यवहार अहवालासोबत सादर करण्यास सांगितले.</td><td></td></tr>
<tr><td>१४</td><td>इतर विषय</td><td>समितीच्या अध्यक्षांनी दि.२१.१२.२०१७ च्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे सुचित केले की प्रत्येक जिल्हयातून त्या वन विभागाशी सल्लामसलत करुन कमीत कमी एक अशी योग्य त्या वेटलॅन्ड क्षेत्राची निवड करावी जी जैवविविधतेने व पर्यावरणीयदृष्टया महत्वाची आहे. जेणेकरुन स्थानिक नागरीकांच्या सहाय्याने वेटलॅन्ड क्षेत्र पर्यटन स्थळ (Eco-Tourism) म्हणून विकसीत करता येईल. प्राप्त जिल्हयांची माहिती पुढील तकत्यात दिली आहे.
<table>
<tr><th>जिल्हा</th><th>निवडलेले पाणथळ क्षेत्र</th></tr>
<tr><td>ठाणे</td><td>रेती बंदर पारसिक</td></tr>
<tr><td>मुंबई उपनगर</td><td>-भांडूप</td></tr>
<tr><td>मुंबई शहर</td><td>-</td></tr>
<tr><td>रायगड</td><td>मुरबे खालापूर व फेटवणे</td></tr>
<tr><td>रत्नागिरी</td><td>-</td></tr>
<tr><td>सिंधुदुर्ग</td><td>-</td></tr>
<tr><td>पालघर</td><td>-</td></tr>
</table>
जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी या करिता स्थळ पहाणी चालू असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधीनी २ दिवसात योग्य जागेची निवड करुन माहिती देण्याबाबत सांगितले. त्यानुसार उर्वरित सर्व जिल्हाधिकारीऱ्यांना पत्राद्वारे कळवून या संदर्भात माहिती घेण्यास समितीने सांगितले.</td><td>सर्व जिल्हाधिकारी</td></tr>
<tr><td>१५</td><td>श्री. ब्रिजेश शर्मा - KW1 मौजे नवघर, सर्वे नं. 265/2,4 व 266/1 आणि 267/2 मुंबई उच्च न्यायालय यांचे आदेश (स्थळ:- मिरा-भाईंदर जि. ठाणे)</td><td>या तक्रारी संदर्भात समितीच्या अध्यक्षांनी सदर क्षेत्र हे NWIA मध्ये येते किंवा येत नाही, याची चौकशी करण्यास सांगितले होते. त्यानुसार तक्रारदाराकडून मिळालेल्या Geo-co-ordinates 19.300590N, 72.877573 च्या पहाणी नुसार सदर क्षेत्र हे NWIA वेटलॅन्डमध्ये येत नाही. (Based on portal mrsac.maharashtra. gov.in/wrd.) त्यामुळे सदर क्षेत्र</td><td>जिल्हाधिकारी ठाणे आणि आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याने समितीने ही तक्रार पुढील बैठकीच्या Agenda मधून बंद करण्यास सांगितले. | |
| १६ | अज्ञात व्यक्ती - KW2<br>Lots of trucks dumpers dumping the red clay in Mangrove. (स्थळ:- सेक्टर-23 घनसोली, नवी मुंबई ) | या तक्रारी संदर्भात दि.३०.०१.२०१८ च्या बैठकीत अध्यक्षांनी सिडको यांना सदर जागेवरील डेब्रीज हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सिडको यांनी या जागेवर काम सुरु असून काम पुर्ण करुन त्या बाबतचा अहवाल पुढील आठवडयात सादर करु असे समितीला सांगितले. | सिडको |
| १७ | तक्रारदार श्री. सचिन देसाई<br>**Complaint ID No- KW3**<br>Website द्वारा तक्रार प्राप्त दि. १२.०२.२०१८ -<br>विषय :- Illegal construction of Skywalk in Dhamapur Lake<br>(स्थळ :- धामापूर ता. मालवण जि. सिंधुदुर्ग) | या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी सिधुदुर्ग यांच्या अहवाल अपेक्षित असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या वतीने कोणीही प्रतिनीधी उपलब्ध नसल्याने या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| १८ | तक्रारदार श्रीमती मिनल देसाई<br>**Complaint ID No- KW4**<br>Website द्वारा तक्रार प्राप्त दि. १२.०२.२०१८ -<br>विषय :- Petrol boat is being run at Dhamapur Lake .<br>(स्थळ :- धामापूर ता.मालवण जि.सिंधुदुर्ग) | या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी सिधुदुर्ग यांच्या अहवाल अपेक्षित असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या वतीने कोणीही प्रतिनीधी उपलब्ध नसल्याने या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| १९ | तकारदार श्री. अक्षय पाटील<br>**Complaint ID No- KW5**<br>Website द्वारा तक्रार प्राप्त दि.१२.०२.२०१८ -<br>विषय:- Illegal mangrove cutting<br>(स्थळ :- विटावा ता. जि. ठाणे) | या तक्रारी संदर्भात योग्य जागेची माहिती उपलब्ध नसल्याने नेमक्या कोणत्या जागेवर कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार समितीने ठाणे महानगरपालिकेला तक्रारदारास दुरध्वनीद्वारा संपर्क करुन संपूर्ण माहिती घेण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी,ठाणे उपवनसरंक्षक ठाणे आणि महानगरपालिका ठाणे |
| २० | श्रीमती श्वेता भट<br>Email द्वारा तक्रार प्राप्त दि.०६.०२.२०१८<br>Destriction of mangrove behind Hiranandani, Kavesar, Thane. | ही तक्रार ठाणे महानगरपालिकेच्या अंतर्गत येत असल्याने या तक्रारी संदर्भात श्रीमती श्वेता भट यांना संपर्काद्वारे तक्रारी बाबत योग्य माहिती घेण्याबाबत समितीने सांगितले आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे आणि उपवनसरंक्षक, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | तकारदार श्री. स्टॅलिन डी<br>Email द्वारा तक्रार प्राप्त दि.१५.०२.२०१८<br>विषय :- Illegal dumping on wetlands along JVLR and Eastern express highway<br>(स्थळ :- जोगेश्वरी विक्रोळी रोड, मुंबई) | या तक्रारी संदर्भात श्री. स्टॅलिन यांनी दिलेल्या GPS Co-odinates नुसार सदस्य सचिवांनी सदर क्षेत्र हे NWIA वेटलॅन्ड क्षेत्रात बाधित असून मानवनिर्मित Salt Pan असल्याचे सांगितले. तसेच श्री. स्टॅलिन यांनी सांगितले की एका वर्षापूर्वी उपजिल्हाधिकारी श्री.नाडे यांनी प्रत्यक्ष जागेची स्थळपहाणी केली असता त्यांनी सदर जागेवर Tidal Flow च्या प्रवाहाच्या दिशेने पाणी वाहू नये अशा अडथळयांना काढून टाकण्याचे आदेश दिले होते. तरी तेव्हा तेथील जागेवर डम्पर्स यांनी रस्त्याच्या दोन बाजूंच्या सहाय्याने तेथे डेब्रिज टाकण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार समितीने तहसिलदार कुर्ला यांना सदर जागेचे डेब्रिज टाकण्याचे थांबविण्यास व तेथील जागेची संपूर्ण स्थळपहाणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

उप आयुक्त (महसूल)
कोकण विभाग

अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.